# उल्हासनगर महानगरपालिका

## पर्यावरण विभाग

## माझी वसुंधरा अभियानातील

## हरित शपथ

वसुंधरा मातेने मला भरभरुन दिले आहे !
वृक्ष आपला श्वास आणि आपल्या भविष्याचा आधार आहे !
माझ्या सभोवतालचे पशु , पक्षी आणि झाडे
हे मला रक्ताच्या नात्यासारखे आहेत !
त्यांच्याकडून माझ्या गरजांपुरते मी जरुर घेईन !
परंतु , अधिक घेण्याचा कदापिही प्रयत्न् करणार नाही !
पाऊस येतो , तो हिरवाईचे स्वप्न् घेउन !
या अभियानात मी अंत : करणापासुन सहभाग़ी होत आहे!
आप्तेष्ट आणि इतरांना या कार्यक्रमात सहभागी होण्यास प्रवृत्त् करण्याचा
मी निर्धार करतो / करते !

फळफळावळ , शोभिवंत आणि सावली देणारी झाडे
मोठया संख्येने लावण्याचा मी सातत्याने प्रयत्न करेन !
वृक्षरोपणानंतर संरक्षण , पाणी पुरवठा ,संगोपण देखभाल इत्यादी
जबाबदारी घेण्याची मी शपथ घेतो / घेते !

वन , वन्यजीव ,जैवविविधता ,सामाजिक वनीकरण ,पर्यावरण यांच्याशी
संबंधित कार्यक्रमांत मी भाग घेईन !

एकंदरीतच वृक्ष् क्रांतीची ही मोहीम निरंतरपणे सुरु ठेवण्याचा
दृढ संकल्प् मी करतो / करते !

---

# उल्हासनगर महानगरपालिका

सेंट्रल प्रदुषण नियंत्रण् मंडळ यांचेतर्फे NCAP (National Clean Air Programme) अंतर्गत हवा प्रदुषण नियंत्रणात आण्ण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे श्री. मदन सोंडे, उपायुक्त यांची नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करणेबाबत.

जा.क्र. उमपा/पर्यावरण/ ५८ /२०२१
दिनांक:-२२ जुलै, २०२१

## कार्यालयीन आदेश

केंद्र व राज्य प्रदुषण नियंत्रण् मंडळ यांचेतर्फे NCAP (National Clean Air Programme) अंतर्गत हवा प्रदुषण रोखण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजनांसाठी उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाकडून मागील वर्षी रु. २० लाख व यावर्षी रु. १ कोटी ९० लाख इतका निधी प्राप्त झालेला आहे.

NCAP (National Clean Air Programme) अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाकडून हवा प्रदुषण नियंत्रणात आण्ण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत होणा-या खर्चासाठी प्राप्त झालेल्या निधीतून उल्हासनगर शहरासाठी करावयाच्या आवश्यक कामांचे नियोजन करणे, नियोजित केलेली कामे पार पाडणे तसेच त्यांस अनुषंगिक कामे संबंधित विभागांनी विहीत मुदतीत करणे इत्यादी आहे. सदर निधी योग्य कामासाठी खर्च होत आहे किंवा नाही हे पाहणे, तसेच सदर निधीचा विनियोग शहरातील हवा प्रदुषण नियंत्रणात आण्ण्यासाठी निश्चित केलेल्या कामांसाठी करणे, त्याची अंमलबजावणी होणे, विहीत मुदतीत कामे पार पाडणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाशी समन्वय साधणे, शहरात हवा प्रदुषण रोखण्यसाठी करावयाच्या कामाबाबत शहर कृती आराखडा तयार करणे इत्यादी बाबी पार पाडण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागातंर्गत नोडल अधिकारी म्हणुन श्री. मदन सोंडे, उपायुक्त यांची याआदेशान्वये नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात येत आहे.

( डॉ. राजा दयानिधी, )
भाप्रसे
आयुक्त्
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,

श्री. मदन सोंडे, उपायुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
पर्यावरण विभाग,

प्रत:- सर्व संबंधित विभागप्रमुख्, उल्हासनगर महानगरपालिका

y/y

# उल्हासनगर महानगरपालिका

सेंट्रल प्रदुषण नियंत्रण् मंडळ यांचेतर्फे NCAP (National Clean Air Programme) अंतर्गत हवा प्रदुषण नियंत्रणात आण्ण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे उल्हासनगर शहरासाठी तयार केलेल्या शहर कृती आराखडा अंमलबजावणी समिती गठीत करणेबाबत.

जा.क्र. उमपा/पर्यावरण/ ५८ /२०२१
दिनांक:-२२ जुलै, २०२१

संदर्भ:- महाराष्ट शासन पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र.एनसीए २०१८/प्र.क्र.१९६(२)/ ता.क्र.२, दिनांक १८/०९/२०१९

## कार्यालयीन आदेश

केंद्र व राज्य प्रदुषण नियंत्रण् मंडळ यांचेतर्फे NCAP (National Clean Air Programme) अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाकडून हवा प्रदुषण रोखण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजनांसाठी मागील वर्षी रु. २० लाख व यावर्षी रु. १ कोटी ९० लाख इतका निधी प्राप्त झालेला आहे.

NCAP (National Clean Air Programme) अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाकडून हवा प्रदुषण नियंत्रणात आण्ण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर होणा-या खर्चासाठी प्राप्त झालेला निधी योग्य कामासाठी खर्च होत आहे किंवा नाही हे पाहणे, तसेच सदर निधीचा विनियोग शहरातील हवा प्रदुषण नियंत्रणात आण्ण्यासाठी निश्चित केलेल्या कामांसाठी करणे, विहीत मुदतीत कामे पार पाडणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाशी समन्वय साधणे, शहरात हवा प्रदुषण रोखण्यसाठी करावयाच्या कामाबाबत शहर कृती आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी होणे, इत्यादी बाबी पार पाडण्यासाठी महाराष्ट शासनाच्या पर्यावरण विभागाकडील संदर्भिय शासन निर्णयानुसार NCAP (National Clean Air Programme) अंतर्गत उल्हासनगर शहराकरीता खालिलप्रमाणे अधिकारी यांची शहर कृती आराखडा अंमलबजावणी समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नांव | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|---|
| १ | डॉ. राजा दयानिधी | आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका | अध्यक्ष |
| २ | श्री. प्रशांत मोहिते | उप- आयुक्त, परिमंडळ-४, उल्हासनगर-३ | सदस्य |
| ३ | श्री. मदन सोंडे | उपायुक्त (पर्यावरण) तथा नोडल अधिकारी,उल्हासनगर महानगरपालिका | सदस्य |
| ४ | डॉ. दिलीप पगारे | वैद्यकिय आरोग्य अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका | सदस्य |

(कृमाप)

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्री. दिपक पाटील | नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय, उल्हासनगर | सदस्य |
| ६ | डॉ. नितीन गोयल | National Environmental Engineering Research Institute {Worli} Mumbai, NEERI | सदस्य |
| ७ | श्री. तानाजी चव्हाण | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण | सदस्य |
| ८ | श्री. निर्मल धामेजा | फोरम ऑफ उल्हासनगर मॅन्युफॅक्च्ररर्स असोसिएशन, उल्हासनगर | सदस्य |
| ९ | श्री. शं,ल.वाघमारे | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण | सदस्य सचिव |

सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात येत आहे.

( डॉ. राजा दयानिधी, )
भाप्रसे
आयुक्त्
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,
सर्व संबंधित समिती सदस्य,
पर्यावरण विभाग,

प्रत:- सर्व संबंधित विभागप्रमुख् यांना माहितीकरीता

# MINUTES OF THE MEETING

**Ulhasnagar City Air Quality Monitoring Committee Meeting held on 27th Dec, 2019 at UMC, 11.30 am onwards**

A meeting of the City Level Air Quality Monitoring Committee was convened by MPCB RO Kalyan at UMC in compliance with the Hon'ble NGT order dated 8/10/2019 and CPCB's letter dated 24/04/2019 for monitoring the progress of implementation of the action plan of the city as per action points suggested by CPCB and submit progress report of the same on quarterly basis for further submission before State level Air Quality Monitoring Committee (AQMC) headed by Principal Secretary, Environment Department, Government of Maharashtra.

Regional Officer, MPCB kalyan communicated the committee member regarding the schedule of the meeting under National Air clean program vide letter no. MPCB/ROK/B-313, dated-20.12.2019. This matter has to be treated as MOST URGENT as per direction of Member Secretary, MPCB.

Meeting was convened by MPCB Regional Officer, Kalyan, in the office of Commissioner, Ulhasnagar Municipal Corporation, Tal-Ulhasnagar, Dist-Thane with AQMC as follows:

1) Representative – District Collector
2) Police Commissioner Representative
3) Municipal Council Representative
4) Educational Institute or Research Institute Expert
5) District Medical Officer
6) Regional Transport Officer
7) Industry Representative

It was decided to include Health & Sanitation officer of UMC, from Educational Institute Principal of CHM College and Executive Engineer (Water Supply) as Municipal Corporation Representative. Industry Representative was proposed from local Industry Association. AQMC members were informed well in advance about the meeting. **Absence of Representatives from Police Commissioner, District Health Officer and Regional Transport Officer was noted.** They had not communicated any reason for absence verbally, written or telephonically. Attendance sheet is enclosed separately. Commissioner UMC as Head of AQMC instructed Accounts Officer to open a separate account for receiving funds under NCAP and submit the bank details to JD Air, MPCB and AQMC at the earliest.

...2

It was decided to assign Mr. Sonwane, Executive Engineer (Water Supply) UMC as coordinator of the AQMC.

Consultant Dr. Geetanjali Kaushik initiated the discussion about the city highlighting the status of Air Quality, Solid Waste Management, Roads, Green Spaces and Industry. In the year 2018-19, Ulhasnagar- Powai Chowk recorded NOx concentrations (54 μg/m$^3$) and RSPM concentrations (114 μg/m$^3$) that were higher than the standard prescribed limits for NOx (40μg/m$^3$) and RSPM (60 μg/ m$^3$). She mentioned that Ulhasnagar has been allocated Rs 20 Lakhs under NCAP out of which Rs 12 Lakhs have been released.

**Revisions in Action Plan were discussed**

1) **Air Quality Monitoring Network** - MPCB will establish 2 CAAQMS in Ulhasnagar city at Gol maidan garden and Sapna garden.
2) **Domestic Fuel**- As per data available with UMC there are 136249 domestic and 8986 commercial LPG connections in Ulhasnagar.
3) **Source Apportionment (SA) and Emission Inventory (EI)**- EI / SA to be undertaken by NEERI.
4) **Actions Plan specific to NOx Control**
   - Planned Anti-Encroachment Drive to remove hawkers from footpaths and roads
   - Drives against vehicles parked on roads
5) **Public Awareness and Complaint Redressal**- UMC has a toll free landline number 18002331103 for registering grievances.

Being an introductory meeting, action plan prepared in excel sheet showing relevant points were allocated to different departments and stake holder. Further it was decided that all the stake holder should come up with action taken report in the next meeting.

The following major issues were discuss and it was decided the concern department shall submit their report in the ensure meeting,

| Sr. No. | Action Point | Concern Department /Stake Holders |
|---|---|---|
| 1 | Launch extensive drives against polluting vehicles- | RTO, Traffic Police, UMC. |
| 2 | Launch public awareness campaigns for air pollution control | UMC to plan workshops |

...3

| | | |
|---|---|---|
| 3 | Prevent parking of vehicles at non-designated areas | Traffic Police |
| 4 | Action Plan for road widening | City Engineer to coordinate with MMRDA |
| 5 | Plan for expressways/bypass | City Engineer to coordinate with MMRDA for KB Road and Murbad road. |
| 6 | Synchronize traffic movements | UMC & Traffic Police - KB road signaling at 3-7 locations, CCTVs to be installed |
| 7 | Installation of remote sensor PUCs | UMC & RTO - information to be obtained from RTO |
| 8 | Public transport system | UMC to apply for funding from Ministry of New & Non-Conventional Energy Sources and ensure smooth traffic for Rickshaws, Ola and Uber taxis. |
| 9 | CNG for public transport | UMC to give letter to diesel/ petrol pumps for conversion to CNG pumps |
| 10 | Introduce water fountains at major traffic intersections | UMC – finalize 4 locations and installed on war foot basis. |
| 11 | Extensive drives against open burning | UMC - shall take action and collect the penalties. |
| 12 | Proper collection of horticulture waste and disposal by way of composting cum gardening approach | UMC – Finalize the 3 locations and start commissioning at earliest |
| 13 | Actions against non-complying industrial units, alternate fuel, promotion of cleaner industries, upgradation of air pollution control | MPCB to issue directives and share actions undertaken |

Action plan for control of air pollution of Ulhasnagar cities is prepared in excel sheet with relevant points was allocated to different departments / stake holders and circulated. Further it was decided that all the stake holders should come of with detailed action taken report for next meeting. It was decided to meet fourth Friday at about 3.00 p.m. every month.

Meeting ended with vote of thanks to the Chairman.

04/01/2020

**Commissioner,**
**Ulhasnagar Municipal Corporation**

**Regional Officer,**
**M. P. C. Board, Kalyan**

# जाहिर आवाहन

उल्हासनगर शहरातील नागरीकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत शहरात विविध कारणाने/घटकांमार्फत हवेचे प्रदुषण होत असल्याची बाब आपल्या निदर्शनास येत असल्यास सदरबाबत टोल फ्री १८००२३३११०३ या क्रमांकावर तक्रार नोंदविता येईल.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाकडून प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मदतीने हवेचे प्रदुषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( मदन सोंडे )
उप-आयुक्त (पर्यावरण)
उल्हासनगर महानगरपालिका